वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, महाराष्ट्र राज्य, पुणे प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.०, राज्यस्तरीय नोडल यंत्रणेची ११ वी बैठक दि.२२.०७.२०२४ रोजी संपन्न झाली.

सदर बैठकीस खालील अधिकारी व सदस्य उपस्थित होते.

- श्री. गणेश पाटील (भा.प्र.से.), सचिव, मृद व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
- श्री. प्रकाश खपले (भा.प्र.से.),आयुक्त मृद व जलसंधारण विभाग, औरंगाबाद तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा २.०, पुणे.
- प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे प्रतिनिधी (व्ही.सी. द्वारे)
- अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे प्रतिनिधी (व्ही.सी. द्वारे)
- उपसचिव, मृद व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई (व्ही.सी. द्वारे)
- श्री. देवेंद्र भांमरे, अवर सचिव, मृद व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई (व्ही.सी. द्वारे)
- महासंचालक, वाल्मी, औरंगाबाद यांचे प्रतिनिधी. (व्ही.सी. द्वारे)
- आयुक्त, मनरेगा, नागपुर यांचे प्रतिनिधी (व्ही.सी. द्वारे)
- श्री. रविंद्र भोसले, अपर मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा २.०, पुणे.
- संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे यांचे प्रतीनिधी.
- आयुक्त, कामगार, कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे प्रतिनिधी (व्ही. सी. द्वारे)
- आयुक्त, पशुसंवर्धन यांचे प्रतिनिधी (व्ही. सी. द्वारे)
- श्री. ॲड. अमित गीते, अध्यक्ष, श्री एकलव्य सेवाभावी संस्था, परभणी (व्ही.सी. द्वारे)
- श्री. यशवंत पांडे, सचिव, अश्वमेघ ग्रामीण पाणलोट क्षेत्र विकास व शैक्षणिक संस्था, फत्तेपूर (व्ही.सी. द्वारे)
- राज्य प्रमुख राष्ट्रीय माहिती विज्ञान केंद्र मुंबई यांचे प्रतिनिधी (व्ही. सी. द्वारे)

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पुर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | राज्यस्तरीय नोडल यंत्रणेच्या दिनांक २३/०२/२०२४ रोजीच्या दहाव्या बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता देणे. | राज्यस्तरीय नोडल यंत्रणेच्या दि.२३.०२.२०२४ रोजीच्या दहाव्या बैठकीच्या इतिवृत्ताचे व सदर बैठकीत झालेल्या निर्णयावर केलेल्या अथवा कार्यवाहीत असलेल्या बाबी समितीस अवगत करून देण्यात आल्या. | राज्यस्तरीय नोडल यंत्रणेच्या दि.२३.०२.२०२४ रोजीच्या दहाव्या बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता देण्यात आली. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा २.०, पुणे. | |
| २ | प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत, दि.२०.०३.२०२३ रोजीच्या SLNA मध्ये मान्य करण्यात आलेले व दि. ३१.०५.२०२३ रोजीच्या SLNA मध्ये रद्द करण्यात आलेले सह मुख्य कार्यकारी अधिकारी पदास मान्यता मिळणेबाबत. | राज्यस्तरीय नोडल एजन्सीच्या दिनांक- २०/०३/२०२३ च्या ५ व्या बैठकीतील विषय क्रमांक- ९ मधील परिशिष्ट-"अ" नुसार आकृतिबंधास मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार या कार्यालयास सह मुख्य कार्यकारी अधिकारी पदास मान्यता देण्यात आली होती.<br>तद्नंतर राज्यस्तरीय नोडल एजन्सीच्या दिनांक- ३१/०५/२०२३ च्या ६ व्या बैठकीतील विषय क्रमांक- १ नुसार ५ व्या बैठकीतील विषय क्रमांक- ९ मधील परिशिष्ट-"अ" प्रमाणे मंजूर करण्यात आलेले पद हे रद्द करण्यात आले.<br>सद्य:परिस्थीतीत प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना पाणलोट विकास यंत्रणा २.० अंतर्गत | आकृतीबंधामध्ये पद निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली. | | |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पुर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | चालू असलेल्या प्रकल्पामधील नियोजित पाणलोट कामे, उपजिवीका मधील नियोजित कामे वेळेत पूर्ण करण्याच्या दृष्टीने सन २०२४-२५ हे वर्ष अत्यंत महत्वाचे आहे. तसेच ही योजना ही सन २०२५-२६ अखेर संपुष्टात येत असल्याने डी.पी.आर. वरील मंजूर कामे व त्यावरील खर्च वेळेत करणे आवश्यक असल्याने त्यावर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने सह मुख्य कार्यकारी अधिकारी हे पद या कार्यालयात असणे अत्यंत गरजेचे आहे. तरी त्यास मान्यता असावी. | | | |
| ३ | प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना पाणलोट विकास यंत्रणा २.० अंतर्गत राज्य, जिल्हा व प्रकल्प स्तरावर संगणक व प्रिंटर उपलब्ध करुन देण्याबाबत. | प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत राज्य जिल्हा व प्रकल्प स्तरावर संगणक व प्रिंटर खरेदी करीता माहिती व तंत्रज्ञान विभाग यांच्याकडून Technical speciation प्राप्त करुन घेऊन Gem Portal वरुन खरेदी करण्यात यावी असा निर्णय झाला. तसेच जिल्हा स्तरीय कार्यालयांकडून खरेदी प्रक्रिया करण्यामध्ये तांत्रीक अडचणी येऊ | प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत राज्य जिल्हा व प्रकल्प स्तरावर संगणक व प्रिंटर खरेदी करीता माहिती व तंत्रज्ञान विभाग यांच्याकडून Technical speciation प्राप्त करुन घेऊन Gem Portal वरुन राज्यस्तरीय कार्यालय व अधिनस्त कार्यालयाकरीता संगणक व प्रिंटर ची खरेदी ही एकाच ठिकाणाहून | | |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पुर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | शकतात त्यामुळे राज्यस्तरीय कार्यालय व अधिनस्त कार्यालयाकरीता संगणक व प्रिंटर ची खरेदी ही एकाच ठिकाणाहून राज्यस्तरीय कार्यालय म्हणजेच वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे या कार्यालयामार्फत खरेदी प्रक्रिया करण्यात येऊन संगणक व प्रिंटर चा पुरवठा अधिनस्त कार्यालयांना करण्यात यावा अशी चर्चा झाली. | राज्यस्तरीय कार्यालय म्हणजेच वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे या कार्यालयामार्फत खरेदी प्रक्रिया करण्यात येऊन संगणक व प्रिंटर चा पुरवठा अधिनस्त कार्यालयांना करण्यात यावा असा निर्णय घेण्यात आला. | | |
| ४ | प्रधान मंत्री कृषी सिंचन योजना-पाणलोट विकास घटक २.० (PMKSY-WDC २.०) अंतर्गत काटेविरहीत निवडूंग रोपवाटिका करणेसाठी अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत. | दि. २८/१२/२०२३ रोजी पार पडलेल्या राज्यस्तरीय नोडल यंत्रणेच्या बैठकीत वाल्मी स्तरावर १ एकर क्षेत्रावर काटेविरहीत निवडूंगाची रोपवाटिका व वनस्पती वाटिका तयार करण्यासाठी मान्यता देण्यात आली आहे. BAIF संस्थेतील डॉ. विठ्ठल कवठाळे यांच्याशी संपर्क साधून वाल्मी स्तरावर तयार करण्यात येणाऱ्या १ एकर रोपवाटिकेचा सविस्तर प्रस्ताव तयार करून वसुंधरा कार्यालयास सादर करण्याबाबत वाल्मी संस्थेस कळविण्यात आले होते.<br>दि.१६/०४/२०२४ रोजीच्या पत्रान्वये वाल्मी | प्रधान मंत्री कृषी सिंचन योजना-पाणलोट विकास घटक २.० (PMKSY-WDC २.०) अंतर्गत वाल्मी स्तरावर काटेविरहीत निवडूंग रोपवाटिका तयार करण्याचा निर्णय समितीने रद्द केला. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे | |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पुर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | संस्थेने रु. १२८.५० लक्षचा १ एकर रोपवाटिका व वनस्पती वाटिका तयार करण्याचा प्रस्ताव वसुंधरा कार्यालयास सादर केला असून या प्रस्तावावर बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. सदर प्रस्तावात रोपवाटीकेसाठी जो अंदाजित खर्च दर्शविण्यात आला आहे तो अवाजवी असल्याचे मत समितीने नमूद केले. | | | |
| ५ | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना- पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत BIAF, उरुळीकांचन संस्थेमार्फत सादर करण्यात आलेल्या " Introduction and Promotion of Spineless Cactus for Improving Livelihood of Farmers In | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना- पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत BAIF, उरुळीकांचन संस्थेमार्फत सादर करण्यात आलेल्या " Introduction and Promotion of Spineless Cactus for Improving Livelihood of Farmers In Maharashtra" प्रस्ताव सादर करण्यात आला असून या प्रस्तावावर बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. सदर प्रस्ताव राज्य मान्यता समितीच्या मान्यतेने पुढील कार्यवाहीस्तव केंद्र शासनास पाठवावयाचा असून केंद्र शासनाच्या सुचनानुसार पुढील कार्यवाही | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना- पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत BAIF, उरुळीकांचन संस्थेमार्फत सादर करण्यात आलेल्या " Introduction and Promotion of Spineless Cactus for Improving Livelihood of Farmers In Maharashtra" सोबत जोडलेल्या परिशिष्ट "अ" मध्ये दर्शविल्याप्रमाणे प्रस्तावास समितीने मान्यता दिली व राज्य मान्यता समितीच्या बैठकीत प्रस्ताव मान्यतेस्तव सादर करण्याच्या सुचना दिल्या. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे व मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई. | |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पुर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | Maharashtra" प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत. | करण्यात येईल अशी माहिती समितीस देण्यात आली. | | | |
| ६ | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना- पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत BIAF, उरुळीकांचन संस्थेमार्फत सादर करण्यात आलेल्या " Production of Tissue — Cultured Plants of Spineless Cactus (Opuntia Ficus-Indica)" या प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत. | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना- पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत BAIF, उरुळीकांचन संस्थेमार्फत सादर करण्यात आलेल्या " Production of Tissue - Cultured Plants of Spineless Cactus (Opuntia Ficus- Indica)" या प्रस्तावावर बैठकीत चर्चा करण्यात आली. सदर प्रस्ताव राज्य मान्यता समितीच्या मान्यतेने केंद्र शासनास पुढील कार्यवाहीस्तव सादर करणे योग्य राहील असे मत अध्यक्षांनी व्यक्त केले. | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना- पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत BAIF, उरुळीकांचन संस्थेमार्फत सादर करण्यात आलेल्या " Production of Tissue - Cultured Plants of Spineless Cactus (Opuntia Ficus-Indica)" या परिशिष्ट "ब" मध्ये दर्शविल्यानुसार प्रस्तावास समितीने मान्यता दिली व राज्य मान्यता समितीच्या बैठकीत प्रस्ताव मान्यतेस्तव सादर करण्याच्या सुचना दिल्या. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे व मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई. | |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पुर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| ७ | सविस्तर प्रकल्प अहवालात अंतर्भूत करण्यासाठी "Livelihood Action Plan" तयार करण्यासाठीच्या प्रपत्रांना मान्यता मिळणेबाबत. | सविस्तर प्रकल्प अहवालात अंतर्भूत करण्यासाठी "Livelihood Action Plan" तयार करण्यासाठीच्या प्रपत्रांबाबत चर्चा करण्यात आली. | सविस्तर प्रकल्प अहवालात अंतर्भूत करण्यासाठी "Livelihood Action Plan" तयार करण्यासाठीच्या सोबतच्या परिशिष्ट "क" मधील २९ प्रपत्रांना मान्यता देण्यात आली. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे | |
| ८ | सविस्तर प्रकल्प अहवालात उत्पादन पद्धती या घटकाचे नियोजन समावेश करण्यासाठीच्या प्रपत्रांना मान्यता मिळणेबाबत. | सविस्तर प्रकल्प अहवालात उत्पादन पद्धती या घटकाचे नियोजन समावेश करण्यासाठीच्या प्रपत्रांबाबत चर्चा करण्यात आली. | सविस्तर प्रकल्प अहवालात उत्पादन पद्धती या घटकाचे नियोजन समावेश करण्यासाठीच्या सोबतच्या परिशिष्ट "ड" मधील १४ प्रपत्रांना मान्यता देण्यात आली. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे | |
| ९ | सविस्तर प्रकल्प अहवालात प्रेरक प्रवेश उपक्रम या घटकाचे नियोजन समावेश | सविस्तर प्रकल्प अहवालात प्रेरक प्रवेश उपक्रम या घटकाचे नियोजन समावेश करण्यासाठीच्या प्रपत्रांबाबत चर्चा करण्यात आली. | सविस्तर प्रकल्प अहवालात प्रेरक प्रवेश उपक्रम या घटकाचे नियोजन समावेश करण्यासाठीच्या सोबतच्या परिशिष्ट "इ" मधील १९ प्रपत्रांना मान्यता देण्यात आली. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे | |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पुर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | करण्यासाठीच्या प्रपत्रांना मान्यता मिळणेबाबत. | | | | |
| १० | जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी), औरंगाबाद या संस्थेमार्फत सादर करण्यात आलेला सन २०२४ ते २०२५ या कालावधीतील प्रशिक्षणाचा आर्थिक व भौतिक अहवाल अवलोकनार्थ. | जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी), छ. संभाजीनगर या संस्थेमार्फत सादर करण्यात आलेला सन २०२४ ते २०२५ या कालावधीतील प्रशिक्षणाचा आर्थिक व भौतिक अहवाल समितीच्या अवलोकनार्थ तथा चर्चेस्तव सादर करण्यात आला. सदर अहवालामधील प्रशिक्षणासाठी प्रत्यक्ष उपस्थित प्रशिक्षणार्थी संख्या जरी कमी असली तरी त्या प्रशिक्षणाची उपस्थिती कमीत कमी ३० संख्या घेऊन गणण्यात आले आहे असे त्यात नमूद करण्यात आले असून त्यानुसार प्रशिक्षण कार्यक्रमाचा खर्च दर्शविण्यात आला असल्याचे उप-मुख्य कार्यकारी यांनी समितीच्या निदर्शनास आणून दिले. नामनिर्देशने प्राप्त करून घेण्यासाठी जी पत्र वसुंधरा कार्यालयाकडून क्षेत्रिय स्तरावरून पाठविण्यात येतात व त्याची प्रत प्रशिक्षणार्थी यादीसोबत ज्यात | वाल्मी स्तरावर वसुंधरा कार्यालयाकडून प्रशिक्षणाच्या यशस्वी नियोजनासाठी कंत्राटी तत्वावर तीन कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. या कर्मचाऱ्यांकडून प्रशिक्षणाचे नियोजन व वसुंधरा कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या प्रशिक्षण यादीनुसार प्रशिक्षणार्थीशी संपर्क साधणे व ते प्रशिक्षणाला उपस्थित राहतील हे निश्चित करणे अपेक्षित आहे. त्यामुळे प्रशिक्षणासाठी प्रशिक्षणार्थींची उपस्थिती ही वाल्मीची जबाबदारी असून वाल्मी संस्थेने प्रत्यक्ष प्रशिक्षणार्थी उपस्थितीनुसारच प्रशिक्षणाचा खर्च दर्शविणे आवश्यक राहील असे निर्देश समितीने दिले. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे व जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी), छ. संभाजीनगर | |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पुर्ण करणेचा कालावधी |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| | | प्रशिक्षणार्थीचे संपर्क क्रमांक नमूद केलेले असतात वाल्मी संस्थेस देखील पाठविण्यात येते. वास्तविक पाहता वाल्मी स्तरावर वसुंधरा कार्यालयाकडून प्रशिक्षणाच्या यशस्वी नियोजनासाठी तीन कर्मचाऱ्यांची कंत्राटी तत्वावर नियुक्ती करण्यात आलेली आहे. या कर्मचाऱ्यांकडून प्रशिक्षणाचे नियोजन व वसुंधरा कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या प्रशिक्षण यादीनुसार प्रशिक्षणार्थींशी संपर्क साधणे व ते प्रशिक्षणाला उपस्थित राहतील हे निश्चित करणे अपेक्षित आहे. परंतु तसे होताना दिसून येत नाही, त्यामुळे प्रत्यक्ष उपस्थिती नुसार प्रशिक्षणाचे देयक तसेच आर्थिक व भौतिक अहवाल वसुंधरा कार्यालयास वाल्मी संस्थेने सादर करणे आवश्यक असल्याचे मत समितीने व्यक्त केले. | | | |
| ११ | जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी), औरंगाबाद या संस्थेमार्फत प्रकल्प कार्यान्वयीन | जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी), छ. संभाजीनगर या संस्थेमार्फत प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा (PIA), जिल्हा प्रशिक्षण संस्था (DRO), प्रकल्प प्रशिक्षण संस्था (PTO) व उपजिविका संसाधन संस्था (LRA) यांचे | जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी), छ. संभाजीनगर ही संस्था मृद व जल संधारण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या अंतर्गत कार्यरत असून या विभागाच्याच प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना- पाणलोट | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे व जल व भूमी व्यवस्थापन संस्था | |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पुर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | यंत्रणा (PIA), जिल्हा प्रशिक्षण संस्था (DRO), प्रकल्प प्रशिक्षण संस्था (PTO) व उपजिविका संसाधन संस्था (LRA) यांचे प्राप्त प्रस्तावांची छाननी करण्यासाठी मोबदला देणेबाबत. | प्राप्त प्रस्तावांची छाननी करण्यासाठी मोबदला देणेबाबत चर्चा करण्यात आली. | विकास घटक २.० या योंजनेत ही संस्था राज्य प्रशिक्षण संस्था म्हणून कार्यरत असून रु. ३२ कोटी एवढा निधी या संस्थेस प्रशिक्षणासाठी वर्ग करण्यात आलेला आहे. त्यामुळे प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा (PIA), जिल्हा प्रशिक्षण संस्था (DRO), प्रकल्प प्रशिक्षण संस्था (PTO) व उपजिविका संसाधन संस्था (LRA) यांचे प्राप्त प्रस्तावांची छाननी करण्यासाठी वेगळ्याने कोणताही मोबदला संस्थेस न देण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. | (वाल्मी), छ. संभाजीनगर | |
| १२ | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत जिल्हा प्रशिक्षण संस्था (DRO), प्रकल्प प्रशिक्षण संस्था (PTO) व उपजिविका संसाधन | प्रधान मंत्री कृषी सिंचन योजना पाणलोट - विकास घटक २.० अंतर्गत जिल्हा संसाधन संस्था (DRO), प्रकल्प प्रशिक्षण संस्था (PTO) आणि उपजीविका संसाधन संस्था (LRA) निवडसूची तयार करण्यासाठी वाल्मी संस्थेकडून राज्यस्तरीय नोडल यंत्रणेच्या निर्देशानुसार छाननी करण्यात आलेली असून सदर संस्थांच्या अंतिम निवडीसाठी प्रस्ताव शासन स्तरावर सादर करण्यात आला असल्याबाबत | प्रधान मंत्री कृषी सिंचन योजना पाणलोट - विकास घटक २.० अंतर्गत राज्यात १४० प्रकल्प कार्यान्वित असून त्यानुसार एका जिल्हा संसाधन संस्थेकडे तीन प्रकल्प अशा एकूण ४७ जिल्हा संसाधन संस्था (DRO) म्हणून निवडण्यात याव्या. प्रकल्प प्रशिक्षण संस्था (PTO) आणि उपजीविका संसाधन संस्था (LRA) या स्तरावर प्रशिक्षणार्थी संख्या जास्त असल्या कारणाने व योजनेचा शिल्लक | | |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पुर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | संस्था (LRA) यांच्या निवडीबाबत. | समितीस अवगत करण्यात आले. जिल्हा संसाधन संस्था (DRO) स्तरावर १३,८०० प्रशिक्षणार्थी, प्रकल्प प्रशिक्षण संस्था (PTO) स्तरावर ६१,८०० प्रशिक्षणार्थी आणि उपजीविका संसाधन संस्था (LRA) स्तरावर १,०३,००० प्रशिक्षणार्थी यांना प्रशिक्षण द्यावयाचे असून जिल्हा संसाधन संस्था स्तरावर प्रशिक्षणार्थीची संख्या कमी असून प्रकल्प प्रशिक्षण संस्था व प्रकल्प प्रशिक्षण संस्था प्रशिक्षणार्थी संख्या तुलनेने जास्त असून योजनेचा अंमलबजावणीसाठीचा कालावधी कमी शिल्लक असल्यामुळे प्रत्येक स्तरावरील प्रशिक्षणार्थी संख्या लक्षात घेऊन त्यानुसार संस्थांची संख्या निश्चिती करणे आवश्यक असल्याचे मत समिती सदस्यांनी व्यक्त केले. | असलेला अंमलबजावणी कालावधी लक्षात घेता प्रत्येक प्रकल्पासाठी एक प्रकल्प प्रशिक्षण संस्था (PTO) अशा एकूण १४० प्रकल्पासाठी १४० प्रकल्प प्रशिक्षण संस्था (PTO) निवडण्यात याव्या व प्रत्येक प्रकल्पासाठी एक उपजीविका संसाधन संस्था (LRA) अशा एकूण १४० प्रकल्पासाठी १४० उपजीविका संसाधन संस्था (LRA) निवडण्यात याव्या असे निर्देश समितीने दिले.<br>परंतु PTO व LRA निवडसूचीमध्ये १४० पेक्षा कमी संस्थांचा समावेश असेल तर प्रत्येक प्रकल्पासाठी एक संस्थेची नेमणूक करुन उर्वरित शिल्लक राहिलेले प्रकल्प हे गुनांकणानुसार गुणांकन तक्त्यामध्ये सुरुवातीच्या क्रमांकावर असणाऱ्या संस्थाना वाटप केले जावे असे निर्देश समितीने दिले. | | |
| १३ | केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना पाणलोट विकास | केंद्र शासनाच्या सूचना नुसार प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेतील कामांचे मध्यावधी मूल्यमापन नोव्हेंबर २०२४ अखेर पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यामुळे योजनेचा कालावधी | केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत योजनेच्या मूल्यमापनासाठी (MELD) वसुंधरा स्तरावर संस्थांची निवड | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा २.०, पुणे. | |

२

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पुर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | घटक २.० अंतर्गत योजनेच्या मूल्यमापनासाठी बाह्यस्थ संस्थांची नेमणूक करणेबाबत. | विचारात घेता मध्यावधी मूल्यमापन करिता वसुंधरा स्तरावर संस्थांची निवड ई-निविदा पद्धतीने करणेबाबत समितीमध्ये सविस्तर चर्चा झाली. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (MELD) यांनी समितीस सांगीतले की, योजनेच्या मुल्यमापनासाठी नामिकासुची अस्तित्वात नाही. यावर मा. सचिव यांच्या सुचने नुसार शासनाद्वारे मुल्यमापनासाठी नामिकासुची उपलब्ध नसल्यामुळे वसुंधरा स्तरावर संस्थांची निवड ई-निविदा पध्दतीने करावी. | ई-निविदा पद्धतीने करण्यासाठी मान्यता देण्यात आली. | | |

(प्रकाश खपले) भा.प्र.से.
मुख्य कार्यकारी अधिकारी,
वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

(गणेश पाटील) भा.प्र.से.
अध्यक्ष, राज्यस्तरीय नोडल यंत्रणा
तथा
सचिव, मृद व जलसंधारण विभाग,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.